# विद्याश्री
# VIDYASHRI

वार्षिकांक २०२२–२३

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

## विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय समुद्रपूर

(नॅक पुनर्मूल्यांकन 2022 B++ श्रेणी CGPA 2.80)

ISO 9001:2015

उच्च शिक्षण व संशोधन केन्द्र

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर

# आमचे प्रेरणास्थान



## स्व. श्रीमती माँ विठाईलक्ष्मी तुळसकर

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

# विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर

## आमचे मार्गदर्शक




**श्री. पांडुरंगजी तुळसकर**

**अध्यक्ष**

---

## आमचे नेतृत्व



**डॉ. उमेश तुळसकर**

सचिव



**डॉ. नयना शिरभाते**

सदस्या



**डॉ. किशोरचंद्र रेवतकर**

प्राचार्य

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

# विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर

## विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा

(रजि. नं. : महा/२०४/८५/एफ-६७०, वर्धा)

### संचालक मंडळ



**श्री. पांडुरंगजी तुळसकर**
अध्यक्ष



**डॉ. निलेश तुळसकर**
उपाध्यक्ष



**डॉ. उमेश तुळसकर**
सचिव



**श्री. विजयराव इटनकर**
सहसचिव



**सौ. रेखा तुळसकर**
कोषाध्यक्ष



**श्रीमती शांताबाई तळवेकर**
सदस्या



**डॉ. नयना शिरभाते**
सदस्या

# विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर

## महाविद्यालय विकास समिती - २०२२-२३

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ या कायद्यातील कलम ९७(१) च्या अंतर्गत महाविद्यालयीन समिती



**श्री. पांडुरंगजी तुळसकर**
पदसिद्ध अध्यक्ष



**डॉ. उमेश तुळसकर**
व्यवस्थापन सचिव



**डॉ. विठोबा चंदनखेडे**
विभागप्रमुख सदस्य



**डॉ. रमेश निखाडे**
अध्यापक सदस्य



**डॉ. प्रबोधकुमार सातपुते**
अध्यापक सदस्य



**डॉ. नयना शिरभाते**
अध्यापक सदस्या



**श्री. लालचंद डेकाटे**
अध्यापकेत्तर सदस्य



**श्री. प्रभाकर आंबटकर**
उद्योग सदस्य



**श्री. विजयराव इटनकर**
समाजसेवा सदस्य



**डॉ. निलेश तुळसकर**
संशोधक सदस्य



**श्री. पंकज वानखेडे**
माजी विद्यार्थी सदस्य



**डॉ. शिल्पा समदूरकर**
समन्वयक सदस्या




**डॉ. किशोरचंद्र रेवतकर**
प्राचार्य व पदसिद्ध सचिव

महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे सभापती व सचिव (विद्यार्थ्यांच्या निवडीनुसार सदस्य घेण्यात येईल)

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, जि. वर्धा द्वारा संचालित

# विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर

## उत्तुंग भरारी



**डॉ. उमेश तुळसकर**
सदस्य – विधिसभा व विद्या परिषद
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर



**डॉ. राजविलास कारमोरे**
अध्यक्ष – अभ्यास मंडळ
(सांख्यिकी व लेखाकर्म)
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर



**डॉ. रमेश निखाडे**
अध्यक्ष – अभ्यास मंडळ
(अर्थशास्त्र)
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर



**डॉ. ईश्वर सोमनाथे**
अध्यक्ष – अभ्यास मंडळ
(वाणिज्य भाषा)
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर



**डॉ. नयना शिरभाते**
सदस्य – अभ्यास मंडळ
(आण्विक जीवशास्त्र आणि
अनुवांशिक अभियांत्रिकी)
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर



**डॉ. शिल्पा समदुरकर**
सदस्य – अभ्यास मंडळ
(गणीत)
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर



**डॉ. विठोबा चंदनखेडे**
सदस्य – अभ्यास मंडळ
(इतिहास)
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर



**डॉ. मनोहर आंबटकर**
सदस्य – अभ्यास मंडळ
प्राणीशास्त्र
रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

# शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे छायाचित्रे



















# विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर

## विद्याश्री २०२३

**कार्यकारी संपादक**
प्रा. गणेश बेले

**सहसंपादक**
डॉ. राजीव कळसकर
डॉ. विजय मानवटकर
राजेश बाभुळकर

**मराठी विभाग**
डॉ. ईश्वर सोमनाथे
डॉ. मिलिंद कांबळे

**इंग्रजी विभाग**
डॉ. राजेशम वेलुपुला
डॉ. नितीन अखुज
डॉ. प्रकाश तळे

**हिंदी विभाग**
फारीश अली

**विद्यार्थी संपादक**
गणेश तिडके (बी. कॉम. ।।।)
कु. काजल ठवरी (बी. कॉम. ।।।)
कु. पुनम थुटे (बी. ए. ।।।)
आशिष हेडाऊ (बी. ए. ।।।)
कु. वैशाली भक्ता (बी. एस्सी ।)
कु. रोशनी जांभुळे (बी. एस्सी ।)

**इंग्रजी विभाग**
घनश्याम कदमधाड
डॉ. स्वाती रेवतकर

**प्रकाशक**
डॉ. किशोरचंद्र रेवतकर
प्राचार्य

**मुद्रक**
महेन्द्र ग्राफिक्स

(एकुण प्रति : २२००)

या वार्षिकांकामध्ये प्रकाशित झालेल्या साहित्यातील/लेखामधील मते ही त्या लेखकांची स्वत:ची मते असुन त्यांच्याशी प्रकाशक, मार्गदर्शक, वार्षिकांक समिती, संपादक मंडळ, संस्था किंवा मुद्रक सहमत असेलच असे नाही. .... प्रकाशक

# विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | लेखकाचे नांव | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | मनोगत | प्राचार्य डॉ. किशोरचंद्र रेवतकर | १ |
| २. | संपादकिय | प्रा. गणेश बेले | २ |
| ३. | प्रिय गुरूजी | अब्राहम लिंकन | ३ |
| ४. | आत्मविश्वास | कु. साक्षी मेश्राम | ४ |
| ५. | आई | कु. यशस्वी मुंगले | ४ |
| ६. | शिक्षक | कु. काजल ठवरी | ५ |
| ७. | बाप | कु. नंदिनी पराते | ५ |
| ८. | मैत्री | कु. साक्षी मेश्राम | ६ |
| ९. | माझी आई | कु. आचल सहारे | ६ |
| १०. | मनातील दु:ख | कु. प्रतिक्षा कुंभारे | ६ |
| ११. | माझं कॉलेज | कु. अपेक्षा नेहारे | ७ |
| १२. | विचित्र पण सत्य | कु. साक्षी मेश्राम | ७ |
| १३. | शाळा | कु. आदिती देवघणे | ८ |
| १४. | नशिब | कु. स्नेहल पढाल | ८ |
| १५. | गभकळी | कु. कल्याणी ढोले | ९ |
| १६. | मैत्री | सतीशसिंग छोयले | ९ |
| १७. | हदे शहर में | भुषण चनेकर | १० |
| १८. | स्वप्न | कु. साक्षी मेश्राम | १० |
| १९. | आई–बाबाचे महत्व | कु. प्राची हुलके | ११ |
| २०. | मराठी विभाग | डॉ. ईश्वर सोमनाथे | १२ |
| २१. | अर्थशास्त्र विभाग | डॉ. प्रबोधकुमार सातपुते | १३ |
| २२. | राज्यशास्त्र विभाग | डॉ. राजकुमार रामटेके | १३ |
| २३. | इतिहास विभाग | डॉ. विठोबा चंदनखेडे | १४ |
| २४. | गणीत विभाग | डॉ. शिल्पा समदूरकर | १४ |
| २५. | प्राणीशास्त्र विभाग | डॉ. मनोहर आंबटकर | १५ |
| २६. | खेल व क्रीडा विभाग | श्री. सी. के. सातपुते | १६ |
| २७. | रसायनशास्त्र विभाग | डॉ. एन. एन. नरूले | १७ |
| २८. | गृहअर्थशास्त्र विभाग | डॉ. विना मेंडुले | १७ |
| २९. | वाणिज्य विभाग | डॉ. रमेश निखाडे | १८ |
| ३०. | राष्ट्रीय सेवा योजना | प्रा. मेघश्याम ठाकरे | १९ |
| ३१. | समाजशास्त्र विभाग | प्रा. मेघश्याम ठाकरे | २० |
| ३२. | एम.सी.व्ही.सी. विभाग | श्री. मनोज कोरेकार | २२ |
| ३३. | कनिष्ठ महाविद्यालय विभाग | श्री. किरण वैद्य | २३ |
| ३४. | आजीवन अध्ययन व विस्तार विभाग | डॉ. अर्चना भेंडे | २४ |
| ३५. | सांस्कृतिक व शैक्षणिक विभाग | डॉ. प्रकाश तळे | २५ |
| ३६. | भौतीकशास्त्र विभाग | डॉ. सदानंद सार्वे | २६ |
| ३७. | इंग्रजी विभाग | डॉ. व्ही. राजेशाम | २७ |
| ३८. | वनस्पतीशास्त्र | डॉ. नयना शिरभाते | २८ |
| ३९. | ग्रंथालय विभाग | डॉ. प्रमोग अलोणे | २८ |
| ४०. | या भारतात बंधूभाव नित्य वसु दे | रा. सं. तुकडोजी महाराज | २९ |

# विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, समुद्रपूर

## मनोगत ......

प्रिय माझ्या लाडक्या विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिनींनो, सर्वांना माझा नमस्कार... मी प्राचार्य या नात्याने आपल्याला सांगू इच्छितो की, विद्या विकास महाविद्यालय, नागपूर विद्यापीठातील एक नावारुपाला आलेले महाविद्यालय आहे. एका समुद्रपूर सारख्या छोट्याशा गावातून महाविद्यालयाचा सुरु झालेला प्रवास थक्क करणारा आहे. विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट द्वारा संचालित विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना दिनांक ८ जुन १९८९ रोजी झाली. आज महाविद्यालयाला ३३ वर्षे पूर्ण होत आहेत. ही महाविद्यालयासाठी आणि समुद्रपूर सारख्या छोट्या तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे.

महाविद्यालयात कनिष्ठ व वरिष्ठ विभागाचा अभ्यासक्रम अद्यावत पध्दतीने शिकविला जातो. सन २००० पासून महाविद्यालय पदव्युत्तर शिक्षणाला सुरुवात झाली. मराठी, इतिहास, समाजशास्त्र या विषयांमध्ये एम.ए. तर २००३ पासून एम.कॉम. सुरु झाले २००६ पासून पदवी स्तरावरील बी.एस.सी. हे अभ्यासक्रम चालू झाले. सन २०१३-१४ या सालापासून एम. एस.सी. रसायनशास्त्र सुरु झाले. महाविद्यालयाला २०११ ला यु.जी.सी. कडून २ (एफ) व १२ (बी) ची मान्यता मिळाली. यु.जी. सी.च्या २०११-१३ या अनुदानातून महाविद्यालयात १०० मुलींच्या साठी सुसज्ज आधुनिक वस्तीगृह बांधण्यात आले. तसेच महाविद्यालयात अद्ययावत वर्ग खोल्या ग्रंथालय, विद्यार्थ्यांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची सुविधा करण्यात आली आहे. महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंगसारख्या सुविधा करण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक पध्दतीने शिक्षण घेता येईल. विद्यार्थ्यांना व्यावसायीक व जीवनामध्ये लायक बनवणारे शिक्षण महाविद्यालयात देण्याचा मानस आहे.

महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणासोबतच त्याला समाजाशी जोडणे आणि त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे हा महाविद्यालयाचा मुख्य हेतू आहे. महाविद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी माणूस म्हणून मोठा व्हावा आणि तो देशाच्या प्रगतीत वाटेकरी ठरावा म्हणूनच महाविद्यालयात माणूस बनवण्याचेही शिक्षण दिले जाते.

यु.जी.सी. ने प्रत्येक महाविद्यालयासाठी नॅक करणे अनिवार्य केले आहे. महाविद्यालयाचा सर्वांगिण शैक्षणिक दर्जा सुधारावा या हेतूने महाविद्यालयाचे दर पाच वर्षांने नॅक मुल्यांकन होत असते. आतापर्यंत महाविद्यालयाच्या दोन वेळा नॅक मुल्यांकन झाले. दि. २७, २८ एप्रिल २०२२ रोजी महाविद्यालयाचे तिसऱ्यांदा नॅक मुल्यांकन झाले आणि या नॅक मुल्यांकनात महाविद्यालयाला बी++ दर्जा मिळाला. ही महाविद्यालयासाठी गौरवाची बाब आहे. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशिल असते. महाविद्यालयात सत्र २०१६-१७ पासून वाणिज्य, मराठी, इतिहास विषयाचे संशोधन केंद्र राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यार्थ्यांसाठी संशोधन केंद्र म्हणजे भविष्यासाठी खूप मोठी संधी होय. महाविद्यालयात चालू शैक्षणिक वर्षापासून विज्ञान शाखेत संशोधन केंद्राची सुरुवात करण्यात आली. तसेच नव्याने महाविद्यालयात NCC ची सुरुवात करण्यात येत आहे. नविन शैक्षणिक धोरणाचा विचार करता महाविद्यालयात नवनविन अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत त्याचा फायदा विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

प्रिय विद्यार्थ्यांनो माझ्या महाविद्यालयातून तुम्हाला उंच उंच भरारी मारता यावी यासाठी महाविद्यालयात चालू सत्रात प्रवेश निश्चित करावा कारण तुमचे चांगले भवितव्य घडवणे हा महाविद्यालयाचा हेतू आहे..

धन्यवाद मित्रांनो....!

**डॉ. किशोरचंद्र रेवतकर**
प्राचार्य

## संपादकीय ......

प्रिय विद्यार्थी मित्रांनो ...

विद्याथी हे प्रचंड उर्जेचे स्त्रोत असतात. त्यांच्यातील या उर्जेला विचारांच्या रूपाने प्रकट होण्यासाठी त्यांना व्यासपीठ हवे असते. योग्य व्यासपीठ जर त्यांना मिळाले तर त्यांच्यातील दडलेली अलौकिक प्रतिभा शब्दरूपाने प्रकट झाल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या कल्पनेला पंख फुटून त्यांची प्रतिभा अनेक क्षेत्रात संचार करू लागते. त्यांच्या व्यक्तिमत्वातील सुप्त गुणांना चालना मिळते व त्यांच्याकडून कळत नकळत सुरेख अशा साहित्यकलेची निर्मिती होते. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर वार्षिकांकामधून होत असते हे अंक खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या कला गुणांना नविन वाट दाखविण्याचे कार्य करीत असतात. 'विद्याश्री' हा आमच्या महाविद्यालयाचा वार्षिकांक विद्यार्थ्यांच्या कलागुणांना साकार करण्यासाठीच शब्दबद्ध करण्यात आलेला आहे. सन २०२२-२३ या शैक्षणिक सत्रातील 'विद्याश्री' हा वार्षिकांक आपल्या हाती सुपूर्द करतांना मनस्वी आनंद होत आहे.

विद्यार्थ्यांच्या मनातील भावविश्वाला नविन आकार मिळावा व विचारांचे नवनविन तरंग शब्दरूपाने उमटावे या विशाल हेतूनेच महाविद्यालय दरवर्षी या वार्षिकांकाची निर्मिती करत असते. या अंकात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लेख, कथा, कविता, ललित इ. साहित्य प्रकार हाताळण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे त्यामुळे विद्यार्थी सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनात एक वेगळी वाट निर्माण करू शकतील ही अपेक्षा.

या वार्षिकांकाच्या निर्मितीसाठी नेहमीच आम्हाला प्रेरीत करणारे आमचे मार्गदर्शक आदरणीय श्री. पांडुरंगजी तुळसकर, अध्यक्ष - विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट, मा. डॉ. निलेश तुळसकर, उपाध्यक्ष, प्रा. डॉ. उमेश तुळसकर, सचिव आणि प्राचार्य, डॉ. किशोरचंद्र रेवतकर यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करणे माझे कर्तव्य आहे.

संपादकीय मंडळातील कार्यतत्पर असणारे प्रा. डॉ. राजीव कळसकर, प्रा. डॉ. विजय मानवटकर व डॉ. राजेश बाभुळकर यांचे मनापासुन आभार व्यक्त करतो.

संपादक मंडळातील विद्यार्थी प्रतिनिधी, महाविद्यालयीन सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी तसेच टंकलेखन करणारे या सर्वांच्या सहकार्याने हा अंक मी आपणांसमोर अगदी अल्पावधीत साकार करू शकलो. या अंकात अनवधनाने काही त्रुटी राहिल्यास पुढील अंकात त्याबाबत दक्षता घेतली जाईल अशी ग्वाही देतो व माझ्या संपादकीय शब्दांना विराम देतो.

या अंकाचे आपण निश्चितच स्वागत कराल, या अपेक्षेसह .....

धन्यवाद !

**प्रा. गणेश बेले**
इंग्रजी विभाग

# प्रिय गुरूजी ....

सगळीच माणसे न्यायप्रिय नसतात, नसतात सगळीच सत्यनिष्ठ, हे शिकेलच माझा मुलगा कधी ना कधी, मात्र त्याला हे देखील शिकवा जगात प्रत्येक बदमाषगकणिक असतो एक साधुचारित पुरूषोत्तमही, स्वार्थी राजकारणी असतात. जगात तसे असतात, अवघं आयुष्य समर्पित करणारे नेतेही असतात, टपलेले वैरी तसे जपणारे मित्रही !मला माहीत आहे. सगळ्या गोष्टी झटपट नाही शिकवता येत... तरीही जमलं तर त्याच्या मनावर ठसवा, घाम गाळून कमावलेला एकच छदाम आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा मौल्यवान आहे. हार कशी स्वीकारावी ते त्याला शिकवा, आणि शिकवा बिजयाचा आनंद संयमानं घ्यायला!तुमच्यात शक्ती असली तर त्याला द्वेषमत्सरापासून दूर रहायला शिकवा, शिकवा त्याला, आपला हर्ष संयमानं व्यक्त करायला. गुंडाना भीत जाऊ नको म्हणावं, त्यांना नमवणं सर्वांत सोपं असतं !जमेल तेवढं दाखवीत चला त्याला ग्रंथभांडाराचं अद्भुत वैभव मात्र त्याबरोबरच, मिळू दे त्याच्या मनाला निवांतपणा सृष्टीचे शाश्वत सौंदर्य अनुभवायला पाहू दे त्याला पक्ष्यांची अस्मान भरारी... सोनेरी उन्हात भिरभिरणारे भ्रमर... आणि हिरव्यागार डोंगर उतारावर डुलणारी चिमुकली फुलेशाळेत त्याला हा धडा मिळू दे, फसवून मिळालेल्या यशापेक्षा सरळ आलेले अपयश श्रेयस्कर आहे. आपल्या कल्पना, आपले विचार यांच्यावरत्याला सांगा, त्यांनं भल्यांशी भलाईनं वागावं, आणि टग्यांना अद्दल घडवावी. त्याला हे पुरेपूर समजवा, की करावी कमाल कमाई त्याने ताकद आणि अक्कल विकून... पण कधीही विक्रय करू नये हृदयाचा आणि आत्म्याचा ! धिक्कार करणाऱ्यांच्या झुंडी आल्या तर कानाडोळा करायला शिकवा त्याला आणि ठसवा त्याच्या मनावर सत्य व न्यायासाठी पाय रोवून लढत रहा.त्याला ममतेने वागवा पण लाडावून ठेवू नका. आणि हेही त्याला सांगा, ऐकावं जनांचं, अगदी सर्वांत... पण गाळून घ्यावं ते सत्याच्या चाळणीतून आणि फोलपट टाकून निकं सत्व तेवढं स्वीकारावं.अगदी तावून सुलाखुन निघाल्याशिवाय लोखंडाचं कणखर पोलाद होत नसतं. त्याच्या अंगी बनवा, अधीर व्हायचं धैर्य, अन् धरला पाहिजे धीर त्यांन जर गाजवायचं असेल शौर्य! आणखीही एक सांगत रहा त्याला, आपला दृढ विश्वास पाहिजे आपल्यावर तरच जडेल उदात्त श्रद्धा मानवजातीवर जमलं तर त्याच्या मनावर बिंबवा-हसत रहावं उरातलं दुःख दाबून, आणि म्हणावं त्याला, आसू ढाळावायची लाज वाटू देऊ नको त्याला शिकवा. तुच्छताबाद्यांना तुच्छ मानायला, अन् चाटुगिरीपासून सावध रहायला. माफ करा गुरूजी! मी फार बोलतो आहे, खूप काही मागतो आहे... पण पहा... जमेल तेवढं अवश्य करायचं !

माझा मुलगा भलताच गोड छोकरा आहे हो तो !!!

- अब्राहम लिंकन

# आत्मविश्वास .....

ये आसमां छीन गया तो क्या?
नया ढूँढ लेंगे,
हम वो परिंदे नही जो
उडना छोड देंगे !!

मत पूछ हौसलें हमारे
आज कितने विक्षब्ध है,
एक नई शुरुआत तथा आरंभ तय है....
माना अभी हम नि:शब्द है!

ये पारावर छूट गया तो क्या?
नया सागर ढूँढ लें,
हम वो कश्तियां नहीं जो
तैरना छोड देंगे !!

कदम चलते रहेंगे....
जब तक श्वास है,
परिस्थिती से परे स्वयं पर हमे विश्वास है,

एक रास्ता मिला नही तो क्या
नई राहे ढूँढ लेंगे,
हम वो मुसाफिर नही जो चलता छोड देंगे !!

ख्वाबों को महकता रखते है,
हम मंजिलो से राबता रखते है
नशा हमें हमारी, फितरत का,
हर हार करती है बुलंद.... इरादा जीत का !

ये मुकाम नही हासिल तो क्या
नये ठिकाणे ढूँढ लेंगे,
हम वो शय नही जो अपनी तलाश छोड देंगे !!

**कु. साक्षी मेश्राम**
11th A (Sci.)

# आई .......

**तू माऊली जगाची**
**साऱ्या विश्वाची आई**
**तुझ्या थोर पुण्याईने**
**घडे विश्व हे सदाही**
**तुझी तळमळ आई**
**जणू पेटलेला दीप**
**मोती शंखात सापडे**
**आई आसवांची ज्योती**
**कोणी सांगत असेना**
**शब्द हेच पानिपाणी**
**जन्म आईचा हा थोर**
**हीच भगवंत वाणी**
**आई माहेर तुझे ग**
**सुख-दु:खांचे हे लेणे**
**सोन्यामोत्यात कोरले**
**तुझ्या शब्दांचे देणे**
**माझे जगणे सुखाचे**
**तुझ्या मांडीवर आई**
**मागणे एवढेच माझे**
**नको काशीची पुण्याई**
**मोती माणकांचे शब्द**
**माझी इवलिसी वाणी**
**आई सारखे या जगी**
**नाही पुण्यवान कोणी**

**यशस्वी मुंगले**
11th C

## शिक्षक ...

कळतच नाही सर मला
काही लिहाव तुमच्या वरती,
कार्यही तुमचे तेवढेच
निल तेवढीच आहे किर्ती
तुम्ही नाही केलीत ङ.ङ.इ.
कायद्याच्या जगातली कधी,
पण जीवनाच्या कायद्याची पध्दत
सर तुमची मात्र होती साधी.

तुम्ही आयुष्यभर प्रयत्न केले
आदर्श विद्यार्थी घडावे म्हणून,
थोडा मी ही प्रयत्न केला सर
त्यात माझ ही नाव यावं म्हणून
सर तुम्ही बोललेले शब्द नी: शब्द
काव्यासारखे वार करत होते
पण जीवनाच्या रणांगणात
लढण्याचे सामर्थ्यही देत होते
सर तुमच्यातला प्रत्येक गोष्टी
मी माझे आदर्श मानतो,
हरलोच आयुष्याच्या वाटेवर तर
आठवून लढायला बसतो.

सर तुमच्याविषयी खुप लिहायच होतं
माझ्या आयुष्याच्या डायरीत
पण अक्षरच सापडेना सर मला
तुम्ही शिकवलेल्या बाराखडीत
तुम्ही तरी प्रयत्न सोडला नाही मी
सर तुम्ही सांगितलं होतं म्हणून
पण तुमच्या या कवितेतून
माझ आयुष्य गेल झिजून

**कु. काजल ठवरी**
B. Com. (Final Yrs.)

## बाप .....

आईचं गुणगान खूप झाले,
बिचाऱ्या बापाने काय केले
बिकट प्रसंगी बापच सदा सोडवी
आपण फक्त गातो आईचीच गोडवी
आईकडे असतील अश्रुंचे पाट,
तर बाप म्हणजे संयमाचा घाट
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई
त्या शिदोरीची सोय ही बापच पाही
देवकी-यशोदेचं प्रेम मनात साठवा,
टोपलीतून बाळास नेणारा वासुदेवही आठवा
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ
काटकसर करुन मुलास देतो पॉकेटमनी
आपण मात्र वापरी शर्ट-पॅन्ट जुनी
मुलीला हवे ब्युटीपार्लर नवी साठी
घरी बाप आटपतो बिन साबणाची दाडी
वयात आल्यावर मुले आपल्याच पिश्नात मग्न
बापाला दिसे मुलांचे शिक्षण, पोरीचे लग्न
मुलाच्या नोकरीसाठी जिना चढून लागते धाप
आण मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप
जीवनभर मुलांच्या पणी बापाच्या सदिच्छा.
त्यांनी समजून घ्यावं हीच माफक इच्छा .....

**कु. नंदिनी पराते**
11th B

## मैत्री ......

मैत्री म्हणजे काय असते ...... ?
एकटेपणातील सहवास म्हणजे मैत्री असते
आनंदाची चाहूल म्हणजे मैत्री असते
दुख:तील दिलासा म्हणजे मैत्री असते
करमणूकीतील विरंगुळा म्हणजे मैत्री असते
संकटातील मदत म्हणजे मैत्री असते
आनंदाचे क्षण म्हणजे मैत्री असते.
कायमची संगत म्हणजे मैत्री असते.
दूर असतो तरी,
आठवण काढणे म्हणजे मैत्री असते.
मित्राची काळजी वाटणे... मैत्री असते.
वाटणारा जिव्हाळा म्हणजे मैत्री असते.
जवळची वाटणारी व्यक्ती म्हणजे मैत्री असते.
जोपासलेली आवड म्हणजे मैत्री असते

मैत्री म्हणजे काय असते....!
मैत्री म्हणजे शेवटी मैत्रीच असते.

**कु. साक्षी मेश्राम**
11th A (Sci.)

## माझी आई ......

आई साठी काय लिहू ....
.... आईसाठी कसे लिहू ....
.... आई साठी पुरतील एवढे ....
.... शब्द नाहीत कोठे ....

.... आई वरती लिहिण्याइतक ....
.... नाही माझे व्यक्तिमत्व मोठे ....
.... आई तु उन्हातली सावली ....
.... आई तु पावसातली छत्री ....
....आई तु थंडीतली शाल ....

.... जीवन हे शेत ....
.... आई म्हणजे विहीर ....
.... जीवन ही नौका तर ....
.... आई .... म्हणजे तीर ....

.... अशी माझी आई ....

**कु. आचल सहारे**
B. Com. II

## मनातील दु:ख

दु:ख माझे वेदनेच्या मैफलीत बसले होते
अश्रूंच्या ओलाव्यात बिचारे दु:खाणे जळले होते
मी करावी किती प्रार्थना जगण्यासाठी मरणाची
जगण्याला जे श्वास हवे ते श्वासच जहरी होते
जुळतात सावल्या सावलीत माझ्या अंधारही अंधारुन जातो
उगाच जगण्याचे हुंदके माझ्यात गहीवरले होते.
असेन मी असेलही काय कुणाला त्याचे
दोष कोणाचे काय सांगु मीच मलाच नकोसे होते

**कु. प्रतिक्षा कुंभारे**
B.Sc. 2nd year (CBZ)

# माझं कॉलेज ...

**आमचे विद्या विकास कॉलेज समुद्रपूर**
**चला मुलांनो आता जाऊ, यश शिखरांच्या कडे**
**विद्या विकास सुंदर आमुचे,**
**समुद्रपूर अमुचे गाव**
**गांधीजीचा जिल्हा आहे**
**वर्धा त्यांचे नाव**
**संस्काराच्या, तालावर मोती कसे घडे**
**मातोश्री देते आम्हा, आदर्शाचे धडे**
**चला शिकुया, होऊ ज्ञानी**
**आयुष्य उजळे,**
**श्रावणातल्या सरीसारखा**
**रिमझिम पाऊस पडे**
**दुपारच्या, सुट्टीमध्ये कशी गंमत घडे**
**मातोश्री देते आम्हा आदर्शाचे धडे**
**हसता खेळता आम्ही होऊ**
**संस्काराचे मोती,**
**हसऱ्या दिव्यांच्या कशा,**
**जळतात ज्योती,**
**शिक्षणाने बघा कसे, आयुष्य उजळे**
**विद्या विकास देते आम्हा आदर्शाचे धडे**
**संस्काराचे  मोती घेवून**
**आम्ही मोठे होवु**
**ज्ञानज्योती लावून जगी,**
**भरारी ही घेवु .....**

**कु. अपेक्षा नेहारे**
11th C

# विचित्र पण सत्य ....

भरलेला खिसा
माणसाला जग दाखवतो
आणि रिकामा खिसा
जगतील माणसं दाखवतो
ज्याला शंभर किलो धानाचं पोतं
उचलता येतं,
त्याला ते विकत घेता येत नाही,
आणि ज्याला विकत घेता येतं
त्याला ते उचलता येत नाही,
विचित्र आहे पण सत्य आहे
आपल्याला जे जे पाहिजे,
ते ते सर्व मिळाले असते तर....
जगायला गंमत आणि
देवाला किंमत राहिली नसती...
चांगले मित्र आणि औषधे
ही आपल्या आयुष्यातील वेदना
दूर करण्याचे काम करतात.
फरक इतकाच की औषधांना
एक्सपायरी डेट असते,
पण मित्रांना नाही.

**कु. साक्षी मेश्राम**
11th A (Sci.)

# शाळा

हे मेघा मझं घेऊन का रे?
माझ्या त्या जून्या शाळेम्हधी...
ती शाळा ते वर्ग नाहीत रे आता तिथे....
तिथे आहे एक भली मोठी इमारत ...
तिला पाहून मी म्हणते खरे माझी शाळा
पण खरं सांगू का?
मला ती माझी माळा वाटतच नाही...
माझी शाळा आता डरवली आहे
माझ्याचं स्वप्नांमध्ये आणि प्रत्येकाच्या हृदयामध्ये ...
कोणी आणेल का शोधून तिला डो। डे।
माझी शाळा... सर्व काही पुसल गेलं आहे...
सुंदर अशा कैनव्हासरती दुसरं मित्र
उमल्यं आहे रंगीबेरंगी रंग भरले गेले आहेत...
आणि माझी शाळा
त्याच आवरणाखाली पडली आहे ...
हे मेघा मझं घेऊन जाशील का रे?
माझ्या त्या जून्या शाळेमध्ये ...
हरवली आहे माझी शाळा
याच पृथ्वीच्या गांभाऱ्याम्हधी..

कु. अदिती देवघरे
B. A. VI Sem. (B)

## *नशिब .....*

जीवन हा एक प्रवास आहे
चालत राहणे कर्तव्य आहे
काय आपणास मिळेल पुढे
हा तर नशिबाचा भाग आहे
कधी आनंद तर कधी दु:ख
हा ऊन सावलीचा खेळ आहे
आंबट, गोड नात्यांची इथे,
एक चविष्ट भेळ आहे.
आयुष्य खुप सुंदर आहे,
जगता येणे महत्वाचे आहे
अडचणी सर्वांनाच आहेत
मात करणं महत्वाचे आहे
आयुष्यास नको होऊ निराश
खरंच इतकं ते कठीण नाही
हे दिवस ही बदलून जातील
स्थिर जगात अस काहीच नाही
जीवन हा एक प्रवास आहे
नशिब त्याचा एक भाग आहे ....

कु. स्नेहल पढाल
11th A

# गर्भकळी

कुजबूज कुजबूज गर्भामध्ये
नित तिची चालली होती
सुंदर फूल होण्यासाठी
एक गर्भकळी आसुलली होती
गर्भनिवाऱ्यात अनेक स्वप्ने
डोळे मिटूनी पाहत होती
तिच्या भावडांना भेटण्यास
एक गर्भकळी आसुलली होती
आईच्या गोड शब्दांना
हुंकार आतून देत होती
स्पर्श आईच्या होण्यासाठी
एक गर्भकळी आसुलली होती
सुंदर जग हे मला ही पहायचयं
त्यासाठी ती धडपडत होती
सुंदर जगी या जन्म घेण्या
एक गर्भकळी आसुसली होती
शब्द अचानक कानी पडले
ऐकून आज ती थरथरत होती
मुलगी आई गर्भात म्हणूनी
आई तिची रडत होती
जिवास धोका जाणूनी आपल्या
गर्भकळी भेदरली होती
काय करावे? कुठे लपावेत
जागा सर्वत्र शोधत होती
मार्ग दिसेना कोठे तिजला
हिरमुसून ती बसली होती
स्वप्ने खरी जळून गेली
रुवन आतून करत होती
हात काळाचे येता जवळी
प्रचंड आकांत करत होती
काय चुक रे माझी देवा,
प्रश्न विधात्यास करत होती
श्वास संपला बघता बघता
निपाचित आता ती पडली होती
फुल होऊनी सुगंध देण्या
एक गर्भकळी आसुसली होती.

कल्याणी वि. ढोले
बी.ए. भाग-२

## मैत्री ....

मैत्री अशी असावी
भरकटलेल्या पाखराला घराची वाट दाखवणारी
सुकलेल्या फुलांना बहर आणणारी,
दुखाच्या वाळवंटात प्रेमाचा पाझर आणणारी
एकटेपणात सहवासाचा दिलासा देणारी
शब्दाविना सर्व काही समजून घेणारी,
न सांगताच डोळ्यातील भाव ओळखणारी .........

सतीशसिंग छोयले
11th B

## हदे शहर से नीकली तो

हदे शहर से नीकली तो गाव गाव चली
कुछ यादे मेरे संग पाव पाव चली.
सफर जो धुप का हुआ तो तजुरबा हुआ,
ओ जिंदगी ही क्या जो छाव छाव चली.

जितुंगा मैं ये खुद से वादा करो,
जितना सोचते हो कोशीश उससे जादा करो
तकदीर भी रुटे पर हिमत ना टुटे
मजबुत इतना इरादा करो

उलज ने बडती जाये तो झेलते रहो.
वक्त उतार दे अगर मैदान मे तो खेलते रहो
लोग कहेंगे तुम को पागल बस सुनते रहो
दबाकर लोगो की बाते मन में अपने सपने बुनते रहो

जिस दिन बदल जायेगा तुम्हारा वक्त सबका
विश्वास बदलेगा और जो था कबी लोगो के
लिए पागल अब ओ इतिहास बदले गा

अपने होसलो के दमपर हम अपनी प्रतिभा दिखा देंगे
भले हि कोइ मंचणा दे हमे हम अपना मंच खुद बना लेंगे

**भुषण दिनकर चनेकार**
11th (B) Sci.

## स्वप्न ......

स्वप्न पहावं मोठ
दिसावे ही छान,
जगण्यात मिळावा आनंद
बनावे महान

आपण बनाव असं
की स्वत: पेक्षा श्रेष्ठ
दुसऱ्याने करावे कौतुक
एकदम उत्कृष्ठ

काय केले म्हणजे
समाधान प्रिय होता येते
दुसऱ्याच भल होण्यास
जन्म झाला समजा येथे

आपल्याला सदैव
आनंद देणारा दुसरा
कोण तो विसरलात?
परमेश्वरा शिवाय ना आसरा

**कु. साक्षी मेश्राम**
11th A (Sci.)

# आई-बाबांचे महत्व

आयुष्यात प्रत्येक नाती महत्वाच्या असतात. पण त्या नात्यातील सर्वात अनमोल नातं हे आई वडिलांच असते. पण आजचे मुल-मुली त्यांचे महत्व विसरत चालले आहे. आई-बाबा हे फक्त शब्दच नाहियेत. तर आपले आयुष्य आहे. त्यांच्याविना आपलं जिवन शून्य आहे. आई-बाबा हे आपल्या जिवनाच्या गाडीचे ते दोन चाके आहेत. ज्याच्यावर आपल्या जिवनाची गाडी चांगल्याप्रकारे चालत आहे, आई ही ती स्त्री आहे जिने आपल्या जिवाचा विचार न करता आपल्या नऊ महिने आपल्या गर्भात वाढविले, किती त्रास व वेदना सहन करुन तिने आपल्याला हे सुंदर आयुष्य दिले. आपल्याला हे सुंदर जग दाखविले. बाबा म्हणजे आपला आधारस्तंभ आहे. ज्याच्यावर मुलांचा विकास अवलंबून असतो. हे दोन व्यक्ती आपल्या आयुष्यात नसेल तर आपलं आयुष्य उध्वस्त होते. आई-बाबाचे महत्व त्या अनाथ पाखरांना विचारा, ज्यांचे आई-बाबा कधीचेच त्यांना सोडून स्वर्गवासी झाले. त्यांच्या डोक्यावरचा तो मायेचा हात कधीचाच हिसकावून घेतला. त्या चिमुकल्या पाखरांना रहायला घरटे तर आहे पण त्या घरट्यात त्यांचे आई-बाबा नाहीत. त्यांचे अश्रु पुसायला कोणीच नाही, पण हे आजच्या सोशल मिडियाच्या काळातील मुल-मुलींना करते कळणार कारण त्यांना व्हाट्सअ‍ॅप वर चॅट करायला वेळ मिळते पण त्या आई-बाबाशी थोडावेळ बसून बोलायला वेळ नाही. त्यांना त्यांच्या मित्रांसोबत फिरायला वेळ आहे, पण आईने कुठे चल म्हटले की, त्यांना जगभराचे काम सुचतात.

काळ बदलतोय तसं आईबाबांसोबतचे जे संबंध आहे. आजच्या मुलामुलींचे तेही बदलतांना दिसत आहे. तो आदर ती नम्रता ते प्रेम या सर्व गोष्टीची कमतरता भासायला लागली आहे. जस-जसे ते मोठे व्हायला लागले त्यांच आई-बाबांसोबतच बोलणं बसणं कमी व्हायला लागले आहे. एकेकाळी ज्या आई-बाबांशिवाय त्यांना झोप सुध्दा येत नव्हती. आज त्यांना त्यांची गरजही भासत नाही. त्यांना जे निर्णय घ्यायचे असतात, ते आपल्या मनानेच घ्यायला सुरुवात केलेली दिसते. त्यांना आपल्या आई-बाबांना सांगायला लाज वाटते, किंवा त्यांना महत्वपूर्ण नाही समजत म्हणून ते आपले निर्णय सांगत नाही. पण तेच निर्णय आपल्या मित्र-मैत्रिनींना सांगायला आवडते का? कारण ते रागावतील, बोलतील त्यांना त्यातलं काही कळत नाही, अशी आजच्या मुलामुलींची स्थिती होत चालली आहे. यात आपण आपल्या आई-बाबांचे महत्व विसरत चाललोय असं वाटतं.

पण आपल्यापेक्षा जास्त उन्हाळे पावसाळे त्यांनी पाहिले आहेत, काय योग्य आहे, काय अयोग्य आहे, हे त्यांना आपल्यापेक्षा जास्त कळते. तरीपण आज आपण त्यांना बोलू देत नाही, ते बोलायला लागले तर आपल्याला त्रास व्हायला लागतो, नेहमी त्यांच बोलणं आपल्याला बळबळ वाटत असते. कोणत्याही आई-बाबांना असे वाटत नाही, की आपल्या मुलामुलींचे वाईट व्हावे, म्हणून ते आपल्याला नेहमी कुठेतरी रोक-टोक करत असते. पण ते रोक-टोक आपल्याला त्रासदायक वाटते. पण आपण त्यांच एकही ऐकत नाही त्यांच ऐकत नसल्यामुळे आपल्या हातांनी ते घडते जे आपण कधीच करु असे त्यांना किंवा आपल्याला वाटत नव्हते, हे सर्व घडल्यानंतर आपल्याला त्यांचे बोलणं त्यांची रोक-टोक आठवत असते, पण तेव्हा खूप वेळ झालेली असते, व आपल्याजवळ आपले आई-बाबा ही घेतावेळेस एक वेळा आपल्या आई-बाबांचा विचार करायला शिका. कारण या फक्त ते दोघेच आहे जे आपल्यावर महत्व कधीच विसरु नका.

**प्राची अंकुश हुलके**
वर्ग- बी.ए. भाग-१

# पदवी पदव्यूत्तर विभागाचे वैशिष्ट्ये .....

## *मराठी विभाग ....*

**शैक्षणिक सत्र – २०२२–२०२३**

मराठी विभागातील शैक्षणिक सत्र २०२२–२३ मध्ये झालेल्या सर्व कार्यक्रमाचे व विभागातील विविध घडामोडींचे ठळक महत्वाचे मुद्दे.

१) शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीलाच मराठी अभ्यास मंडळ उद्‌घाटन कार्यक्रम

२) मराठी विभागात बी.ए., बी.कॉम. व बी.एस.सी. च्या विद्यार्थ्यांकरीता ब्रीज कोर्सची अंमलबजावणी

३) विभागातील विद्यार्थ्यांकरीता अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

४) विद्या विकास महाविद्यालय मराठी विभाग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा अभ्यासक्रमावर आधारित राष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन दि.०२/११/२०२२ ला करण्यात आले होते. व सदर चर्चासत्राचे उद्‌घाटक व प्रमुख अतिथी अनुक्रमे रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचे प्रकुलगुरु डॉ. संजय दुधे व मानसशास्त्र अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे सर उपस्थित होते.

५) मराठी विभागात मराठी भाषा पंधरवाड्या निमित्य व्याख्यान कार्यक्रम व मराठी भाषा गौरव दिन २७ फेब्रुवारी २०२३ ला साजरा करण्यात आला. उपरोक्त दोन्ही कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या डॉ. वंदना पळसापुरे, वर्धा व कवयित्रि मा. संगिता तपासे, सेलु ह्या होत्या.

६) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी अभ्यासमंडळावर मराठी विभागप्रमुख डॉ. ईश्वर यांची नियुक्ती

७) अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या महाराष्ट्र प्रांत कार्यकारिणीवर शैक्षिक प्रकोष्ठ म्हणून डॉ. ईश्वर सोमनाथे यांची नियुक्ती.

८) मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. मिलींद कांबळे यांची सहावी वांझ कादंबरी प्रकाशित झाली व नियोजित सातवी ठणक कादंबरी प्रकाशनच्या मार्गावर मार्गस्थ/

९) शैक्षणिक सत्र २०२२–२३ मध्ये मराठी विभागातील प्राध्यापकांचे संशोधनपर लेख व इतर साहित्य प्रकाशित.

| सहाय्यक प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापिका | मराठी विभाग प्रमुख |
|---|---|---|
| **डॉ. मिलींद कांबळे** | **प्रा. स्मिता काळे** (C.H.B.) | **डॉ. ईश्वर सोमनाथे** |

# राज्यशास्त्र विभाग

**प्रमुख वैशिष्ट्ये**

* इ.स. १९८९ महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात राज्यशास्त्र विषयाची सुरुवात (पदवी स्तर)
* सत्र २०२२–२३ मध्ये पदवी स्तरावर पाचशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा प्रवेश.
* उच्च विद्याविभूषीत व अनुभवी प्राध्यापक वर्ग
* रा.तु.म. नागपूर विद्यापीठ परिक्षेत राज्यशास्त्र विषयाच्या पाच पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना १०० पैकी १०० गुण.
* प्रत्येक वर्षी महाविद्यालयात राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना.
* राज्यशास्त्र विभागातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन
* अभ्यासक्रम आधारित ऊीश डरलीरीू ची सुरुवात.

**डॉ. राजकुमार रामटेके**

**राज्यशास्त्र विभाग प्रमुख**

## अर्थशास्त्र विभाग ......

अर्थशास्त्र विभागातील शैक्षणिक सत्र २०२२–२३ मध्ये झालेल्या सर्व कार्यक्रमांचे विभागाच्या घडामोडीबद्दल ठळक महत्वाचे मुद्दे

१) दि. १८ जुलै ते ३० जुलै २०२२ दरम्यान विभागाचे वतीने Bridge कोर्स चे आयोजन करण्यात आले.
२) दि. ०८/०८/२०२२ ला Aptitude Test घेण्यात आली.
३) दि. १२/०८/२०२२ ला विभागाच्या वतीने Information Programme चे आयोजन करण्यात आले.
४) दि. २२/०८/२०२२ ला अभ्यास मंडळाचा उद्घाटन कार्यक्रम घेण्यात आला. प्रमुख पाहूणे श्री. रामटेके सर तसेच प्रा. डॉ. सोमनाथे सर उपस्थित होते.
५) दि. ३०/०८/२०२२ ला भारतीय अर्थव्यवस्था या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.
६) दि. ०७/०९/२०२२ ला बचतीचे महत्व या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख अतिथी डॉ. वासुदेव चौधरी उपस्थित होते.
७) दि. १७/१०/२०२२ व दि. १४/०२/२०२३ ला Students Seminar चे आयोजन करण्यात आलेले होते.
८) दि. ०९/०३/२०२३ ला Modern Sanking System या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. आर.जी. कळसकर सर व डॉ. आय.के. सोमनाथे सर उपस्थित होते.
९) दि. १५/०३/२०२३ ला Day Celebration अंतर्गत जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला. प्रा. गणेश बेले प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होते.

**डॉ. प्रबोधनकुमार एम. सातपुते**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

---

## इतिहास विभाग

**प्रमुख वैशिष्ट्ये**

* इ.स. १९८९ महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात इतिहास विषयाची सुरुवात (पदवी स्तर)
* इ.स. २००० पासून महाविद्यालयात पदव्युत्तरल स्तरावर इतिहास विषयाची सुरुवात.
* सत्र २०२२–२३ मध्ये पदवी व पदव्युत्तर स्तरावर एकूण सातशे पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा प्रवेश.
* उच्च विद्या विभूषीत व अनुभवी प्राध्यापक वर्ग
* इतिहास विभाग प्रमुख डॉ. व्ही. एम. चंदनखेडे यांची रा.तु.म. नागपूर विद्यापीठ इतिहास अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती.
* महाविद्यालयाचा विद्यार्थी मुकुल गंगादास ढोरे रा.तु.म. नागपूर विद्यापीठ एम.ए. इतिहास उन्हाळी २०२२ परीक्षेत सातवा मेरीट.
* दरवर्षी महाविद्यालयात इतिहास अभ्यास मंडळाची स्थापना.
* विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरीता विभागातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन
* अभ्यासक्रम आधारित Core Labrary ची सुरुवात.

**डॉ. व्ही. एम. चंदनखेडे**
इतिहास विभाग प्रमुख

## खेल व क्रीडा विभाग (Games And Sports Department)

महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थ्यांना विविध क्रीडा स्पर्धेत सहभागी होता येईल, या दृष्टीने विद्यार्थ्यांना सरावाकरीता क्रीडांगणावर तसेच आंतरगृहामध्ये (Indoor Hall) सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यात विविध खेळांचे प्रशिक्षण व शिबीरांचे आयोजन करण्यात येते. या माध्यमातून तालुकास्तर, जिल्हास्तर, विभागीय स्तर, राज्य स्तर, महाविद्यालयीन स्पर्धा, आंतर महाविद्यालयातील स्पर्धा, तसेच आंतर विद्यापीठ स्पर्धेकरीता तयार करण्यात येते. याकरीता खालील सुविधा महाविद्यालयात उपलब्ध आहे.

१) कबड्डी – (मुले व मुली) तिन ग्राऊंड उपलब्ध आहे.

२) व्हॉलीबॉल – दोन ग्राऊंड

३) खो–खो – दोन ग्राऊंड

४) मैदानी खेळ – १) लांब उडी २) तिहेरी उडी

३) गोळा फेक ४) थाळी फेक ५) हातोडा फेक ६) भाला फेक

६) धावण्याच्या शर्यती – १००,२००,४००,८००,१५००,३००० तसेच लांब अंतराच्या शर्यती

५) क्रिकेट – १

६) फुटबॉल – १

७) बॅड मिंटन – १ (Indoor Hall)

८) कराटे– प्रशिक्षण व शिबिराचे आयोजन

९) बॉक्सींग –

१०) किक बॉक्सींग –

११) थांग–ता–मार्शल आर्ट–

१२) अष्टे–डू– आखाडा

१३) बेल्ट रेसलींग

१४) ज्यूदो (Judo)

१५) कुस्ती (Wrestting) या व्यतीरिक्त विद्यार्थ्यांकरीता व्यायाम शाळेची उपलब्धता आहे.

सी. के. सातपुते

---

## Department of Mathematics.

* Mathematics is a backbone of Science and Technology.
* This subject is a fundamental part of humanm thought and logic
* Mathematical knowledge plays a crucial role in understanding the contents of other subjects like Physics, Chemistry, Social Studies, Music etc.
* Mathematical literacy is taken to include basic compeitational skills, quantitative reasoning special ability etec. Mathematical concepts are used to above teh problems in Science, engineering and economics.
* Student centre activities organize by the department every year so that students learn to accept Competitions as a healthy challenge.
* For the overall de velopment of the students, Mathematics department always take on enitiative to provide them a platform by arranging acedemic activities like quiz competition, poster presentation, seminar activitiy, model making etc.
* Through these competition, department try to upgrade their thinking power simply to think out of the box. The objective of the department is to create an enterest among students about the subject and let them realise the role of Mathematics in our day-to-day life.

**Dr. Shilpa Samdurkar**
Head - Department Mathematics

## DEPARTMENT OF ZOOLOGY

This department is dedicated to the study of animals, ecology, evolution, and physiology, fisheries, entomology etc, Zoology is diverse field that encompasses everything from the study of tiny single- celled organisms to large, complex mammals.

Studying of a Zoology gives the opportunity to study and learn about animals from around the world. Many Zoology Departments offer field courses where students can travel to remote locations and study animals in their natural habitats. These course provide students with the opportunity to gain hands-on experience with animals and learn about the unique challenges facing different.

In continuation with this our department has conducted various programs to know about the importance of studying zoology and student can gain the knowledge off the syllabus. These programs are as follows.

1) One Week workshop for the Lab Attendant on dated 1 July, 2022
2) Inauguration of Zoological Society on dated 21 July 2022
3) Bridge Course on dated 15th July-30th July 2022.
4) Induction program on dated 12 August 2022
5) Guest lecture on “Role on Honey bee pollination in Food Security of India” on dated 23 th Sepember 2022.
6) World Animal Day celebration on dated 4th October 2022.
7) World Animal Week Program on dated 6 th October 2022.
8) One day camp on Health Checkup on dated 9th November 2022
9) Department Tour to Hyderabad on dated 3rd December-7th December 2022.
10) Report on Andmelawa on dated 6th and 7th January 2023.
11) Scinitillation 23 seminar compitation on dated 24th Febuary 2023
12) Department organised competition on occasion of National Science Day on 28 th Febuary 2023
13) Open quize on National Science Day on 28th Febuary 2023
14) World Wildlife Day Celebration on dated 3rd March 2023.
15) Program on Women’s Empowerment on dated 23rd March 2023

